**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.**
2. **रब्बी हंगाम २०२५ साठी ३७ हजार ९५२ कोटी रुपयांच्या खत अनुदानाला केंद्र सरकारची मान्यता.**
3. **विकसित महाराष्ट्र-२०४७ या व्हिजन डॉक्युमेंटला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हिरवा कंदील.**
4. **शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसह विविध मागण्यांसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात महाएल्गार मोर्चा नागपुरात दाखल.**

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

आठव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. हा आयोग १८ महिन्यांच्या आत त्यांच्या शिफारशी सादर करेल. न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई अध्यक्षा म्हणून आयोगाचे नेतृत्व करतील, तर प्राध्यापक पुलक घोष सदस्य असतील. पंकज जैन यांची आयोगाचे सदस्य-सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्वनी वैष्णव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली -

***इतने कम समय में 8th सेंट्रल पे कमिशन का गठन भी कर दिया गया। इसके लिए काफी बड़ा कनसल्टेशन होता है। कई मंत्रालय जिनमें बड़ी संख्या में सरकारी कर्मचारी है, सेंट्रल गवर्नमेंट के डिफेन्स हो गया, होम हो गया रेलवे हो गया और डीओपीटी के माध्यम से जो जॉईंट कन्सलटेटिव्ह मेकनिजम है, सभी यूनियन्स का, सभी फेडरेशंस का उस जेसीएम के साथ भी डिटेल्ड कन्सल्टेशन होता है। इन सब कन्सल्टेशन के बाद में ये टर्म्स ऑफ रेफरंस परमिशन किया गया है। तो ये बहुत ही एक इम्पॉर्टन्ट टाइमली एक्शन ले लिया गया है। 18 मंथ्स के अंदर ये रिपोर्ट आएगी इसकी 8th पे कमिशन।***

**खत अनुदान**

रब्बी हंगाम २०२५ साठी केंद्र सरकारनं ३७ हजार ९५२ कोटी रुपयांच्या खत अनुदानाला मान्यता दिली आहे. हे दर १ ऑक्टोबर २०२५ पासून लागू करण्यात येतील. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात डायअमोनियम फॉस्फेट (डीएपी), ट्रिपल सुपर फॉस्फेट (टीएसपी) तसंच इतर फॉस्फेटिक आणि पोटॅशिक खतांची उपलब्धता सुनिश्चित होईल. कोणत्याही वाढीव एमआरपीशिवाय ही खतं उपलब्ध करून देण्यासाठी विशेष पॅकेज देण्यात आलं आहे. याशिवाय युरियाची उपलब्धता वाढविण्यासाठी देशांतर्गत आणि आयात केलेलं अमोनियम सल्फेट अनुदानित दरात उपलब्ध करून दिलं जाणार आहे. या निर्णयामुळे खतांचा संतुलित वापर वाढीस लागून उत्पादनक्षमता आणि शेतीतील टिकाऊपणा वृद्धिंगत होईल, असा सरकारचा विश्वास आहे.

**राज्य मंत्रिमंडळ निर्णय**

विकसित महाराष्ट्र-२०४७ या व्हिजन डॉक्युमेंटला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली असून, त्याची अंमलबजावणी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली गठीत करण्यात येणाऱ्या VMU अर्थात 'विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट' मार्फत केली जाणार आहे. या दस्ताऐवजासाठी नागरिकांच्या मतांचं ए-आय-आधारित विश्लेषण करण्यात येणार असून, राज्य आणि जिल्हा पातळीवरील १६ संकल्पना आणि १०० उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज झालेल्या अन्य निर्णयांमध्ये महापालिका, नगरपरिषद, नगरपंचायती तसेच ग्रामपंचायतींच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. तसंच, वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील मौजे करडा इथल्या सुविदे फाउंडेशनला देण्यात आलेल्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्ट्याच्या नूतनीकरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सुविदे फाउंडेशन कृषि विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणारी संस्था असून ती ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालविण्यात येते. त्यामुळे सध्या आकारण्यात येणारा भाडेपट्टा कमी करण्यात यावा, अशी विनंती शासनाकडे करण्यात आली होती. त्यानुसार सन २०२२ ते २४ या कालावधीतील थकीत भाडेपट्टयाची रक्कम आणि त्यावरील दंडव्याजाची रक्कम भरून घेऊन, या फाउंडेशनला ही जमीन नाममात्र एक रुपया या दराने ३० वर्षांकरिता देण्यास मान्यता देण्यात आली.

**राष्ट्रपती**

भारत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वचनबद्ध असून त्या दिशेनं ठोस पावलं उचलत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत आयएसए अर्थात आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या आठव्या अधिवेशनाला संबोधित करत होत्या. हवामान बदलाचा संपूर्ण जगावर गंभीर परिणाम होत आहे. त्याचा सामना करण्यासाठी तातडीनं ठोस पावलं उचलण्याची गरज असून त्यासाठी सूर्य हा सौर ऊर्जेचा शाश्वत स्रोत महत्त्वाचा असल्याचं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

***The ISA represents a significant step to us addressing this global challenge by encouraging the adoption in use of solar energy. Solar energy is a rediscovery open ancient truth that is, Sun is the most democratic source of energy, accessible to all and becoming Belonging to non the solar for all initiative Government of India is based on this concept.***

पुढचे चार दिवस चालणाऱ्या या संमेलनात १२४ देशातले विविध विभागांचे प्रतिनिधी आणि ४० हून अधिक देशांचे मंत्री उपस्थित राहणार आहेत. सौर ऊर्जा क्षेत्रात जागतिक समुदायातलं सहकार्य वाढवण्यासाठी तसंच सर्वांना परवडणाऱ्या दरात सौर ऊर्जा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं उपाययोजना करण्यासंदर्भात यावेळी चर्चा होणार आहेत.

**महाएल्गार मोर्चा**

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू हजारो समर्थकासह नागपुरातील जामठा परिसरात दाखल झाले आहेत. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती,शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन, तसंच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या हक्कांसाठी नागपूरमध्ये आज राज्यभरातील शेतकरी संघटना महाएल्गार आंदोलन करत आहेत. बच्चू कडूंच्या नेतृत्वात वर्धा इथून आज बाईक रॅलीनं या आंदोलनाला सुरुवात झाली. जामठ्याजवळील परिसरात बच्चू कडू जमलेल्या हजारो शेतकऱ्यांना संबोधित करणार आहेत. संपूर्ण कर्जमाफी घेतल्याशिवाय माघार घेणार नाही, असं कडू यावेळी म्हणाले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री निवास असलेल्या रामगिरीची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. दरम्यान, जामठा परिसरात सकाळपासून शेकडो शेतकरी उपस्थित आहेत. कॉंग्रेससह अनेक शेतकरी संघटनांनी या महाएल्गार मोर्चाला पाठिंबा दिला असल्याचं आमच्या प्रतिनिधीनं सांगितलं आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

राज्यात बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा, म्हणजे एम सँडचा वापर करण्याबाबत धोरण निश्चितीसंबंधीचा शासन आदेश आज जारी करण्यात आला. या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत एम सँड युनिट मंजुरीसाठी असलेले शासनाचे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना बहाल करण्यात आले आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. “महायुती होणारच आणि आम्ही ५१ टक्के मतांसह निवडणूक जिंकू,” असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. निवडणुकीसंदर्भातील अमित शाह यांच्या वक्तव्याचा विपर्यास करू नये, तो पक्षबांधणीसंदर्भात होता, असंही ते म्हणाले. मतदारयादी शुद्धिकरण ही भाजपचीच जुनी मागणी असल्याचं देखील त्यांनी स्पष्ट केलं.

**बाबू बिरादार निधन**

मराठी साहित्यक्षेत्रात संवेदनशील आणि वास्तववादी लेखनासाठी ओळखले जाणारे ज्येष्ठ साहित्यिक बाबू बिरादार यांचं आज निधन झालं. आज संध्याकाळी नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील मंगाजी वाडी या ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत. बिरादार यांच्या ‘अंतःपुरुष’, ‘अग्निकाष्ठ’, ‘कावड’, ‘संभूती’ या कादंबऱ्यांनी मराठी साहित्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**खुलासा**

काही वृत्तपत्रांनी अमरावतीच्या माजी पालकमंत्री आणि माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री कॉँग्रेस नेत्या वसुधा देशमुख यांचं निधन झाल्याची बातमी दिली. या बातमीत तथ्य नसून त्यांचं आरोग्य सकुशल असल्याचा खुलासा त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

**जीएसटी**

जीएसटीचे दर कमी करण्यात आल्यामुळे भारतात बचत उत्सव सुरू आहे. त्याचप्रमाणं खरेदीला देखील चालना मिळत आहे. दसरा दिवाळी दरम्यान कपडे,

पादत्राणं, नवीन उपकरणं इ. खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल असतो. या सर्व वस्तूंवरील जीएसटी दर कमी झाल्यामुळे खरेदी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तसंच सोनं आणि चांदीवरील जीएसटी दर कमी झाल्यामुळे धनत्रयोदशीच्या दिवशी ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. यासोबतच फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, चार चाकी वाहन इत्यादींची खरेदी सुद्धा जीएसटी दर कपातीमुळे वाढली असल्याचं समोर येत आहे.

**'भगवान बिरसा कलासंगम'**

आदिवासी एकता मित्र मंडळ, स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्ट आणि प्रगती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमानं भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंती वर्षानिमित्त नवसारी, अमरावती इथल्या महर्षी पब्लिक स्कूलमध्ये आज 'भगवान बिरसा कलासंगम' ही राज्यस्तरीय आदिवासी कलास्पर्धेची पश्चिम विदर्भाची विभागीय फेरी उत्साहात पार पडली. नृत्य, गायन, वादय वादन, चित्रकला, हस्तकला या प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात आली. पश्चिम विदर्भातील विविधरंगी आदिवासी पोशाख केलेल्या ४०० स्पर्धकांनी यात सहभाग घेतला होता.

**युनिटी मार्च**

युवा भारत द्वारा 'सरदार@150 युनिटी मार्च' विकसित भारत पदयात्रेचं आयोजन युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय, भारत सरकारच्या यवतमाळ कार्यालयाद्वारा करण्यात आलं आहे. या पदयात्रेचा उद्देश युवकांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची, सामाजिक जबाबदारीची भावना जागृत करणं आणि एकतेची भावना बळकट करणं हा आहे, असं जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. यवतमाळमध्ये 31 ऑक्टोबर रोजी नेहरू स्टेडियम इथून ही पदयात्रा निघेल.

**गंगाराम गवाणकर निधन**

प्रसिद्ध नाटककार आणि 'वस्त्रहरण' या गाजलेल्या नाटकाचे लेखक गंगाराम गवाणकर यांचं वयाच्या 86 व्या वर्षी काल मुंबईत निधन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसच अजित पवार यांनी ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांना श्रद्धांजली वाहिली. गंगाराम गवाणकर यांनी मालवणी बोलीभाषेच्या अस्सल भावविश्वाला मुख्य प्रवाहात आणल्याचं त्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

**हवामान**

विदर्भातील नागपूरसह बहुतांश जिल्ह्यांमध्ये उद्या आणि परवा मुसळधार पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. नागपूरसह वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये उद्या मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून आज चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, येत्या 31 तारखेपर्यंत हवामान कमी अधिक प्रमाणात ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

******